# प्रकरण पहिले

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना व अभ्यासाची रूपरेषा


| | |
|---|---|
| १.१ | नागरी बँकांचा पूर्वेतिहास |
| १.२ | नागरी सहकारी बँकेच्या व्याख्या |
| १.३ | नागरी सहकारी बँकांची उद्दिष्ट्ये |
| १.४ | नागरी बँकांचे कार्यक्षेत्र |
| १.५ | नागरी बँकांचे सभासदत्व |
| १.६ | नागरी बँकांचे व्यवस्थापन |
| १.७ | नागरी बँकांचे भागभांडवल |
| १.८ | अभ्यासाची उद्दिष्ट्ये |
| १.९ | अभ्यासाची परिकल्पना |
| १.१० | अभ्यासाची पद्धती |
| १.११ | कालखंड |
| १.१२ | संशोधनाचे स्वरूप |
| १.१३ | माहितीचे संकलन |
| १.१४ | साहित्याचा आढावा |
| १.१५ | अभ्यासाचा आराखडा |
| १.१६ | अभ्यासाच्या मर्यादा |
| १.१७ | सारांश |

प्रकरण १ ले

# प्रस्तावना व अभ्यासाची रूपरेषा

## प्रस्तावना :

शहरी भागातील अल्प उत्पन्न गट व मध्यमवर्गीय लोक तसेच व्यापारी, पगारदार नोकर, फेरीवाले, कारागीर, व्यावसायिक, मजूर, उद्योजक इत्यादींच्या निर्माण होणाऱ्या कर्जाच्या गरजातून भारतात नागरी सहकारी बँकांचा विकास झालेला दिसून येतो. तसेच नागरी सहकारी बँकांचा प्रमुख उद्देश शहरी भागातील अल्प उत्पन्न असणारे लोक तसेच पगारदार, कारागीर, व्यावसायिक, मजूर व्यापारी इत्यादींना बचतीची सवय लागावी यासाठी शहरी भागात नागरी बँकांचा उदय झालेला दिसून येतो. अशा बँका प्रामुख्याने शहरी व निमशहरी भागात आहेत.

एखाद्या शहरापुरती बँकेच्या नियमानुसार मर्यादित देता धारण केलेली, प्रामुख्याने शहरातील लोकांसाठी आणि इतरांकडून ठेवी गोळा करणारी, त्यांना वैयक्तिक, व्यावसायिक तारणांवर, सोने-चांदी किंवा संपत्तीच्या तारणांवर कर्जपुरवठा करणारी आणि बँकविषयी सेवासुविधा पुरविणारी संस्था म्हणजे नागरी बँका होय.

## १.१ पूर्वेतिहास :

भारतात नागरी सहकारी बँकांची सुरुवात १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात झाली. भारतात पहिली नागरी सहकारी सोसायटी गुजरातमधील बडोदा शहरात महाराष्ट्रातील मध्यमवर्गीय मंडळींनी स्वहित संगोपनासाठी सहकारी तत्त्वावर ५ फेब्रुवारी १८८९ रोजी एका नागरी सहकारी बँकेची सुरुवात केली. भारतातील पहिली नागरी सहकारी बँक म्हणून त्यास "अन्योन नागरी सहकारी बँक लि., बडोदा" बँकेचा उल्लेख केला जातो.

जगातील इतर राष्ट्रांप्रमाणेच भारतातसुद्धा सहकारी चळवळीचा प्रारंभ ग्रामीण जनतेच्या दारिद्र्यातून, पिळवणुकीतून झालेला आहे. सावकारांच्या पिळवणुकीच्या विळख्यातून बाहेर पडण्यासाठी व आर्थिक स्वायत्तता प्राप्त करण्यासाठी संघटित प्रयत्नांची आवश्यकता होती. त्यासाठी सन १९०१ च्या

फेमिन कमिशनने (Agriculture Bank of Egypt) सारख्या सहकारी पेढ्या भारतात सुरू करण्याची शिफारस केली.

भारतात १९०४ च्या कायद्याने सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ रोवली गेली. या कायद्याने सहकारी संस्थांची ग्रामीण आणि नागरी अशी विभागणी केली. त्याचबरोबर १९११ च्या सहकारी कायद्याने बिगर शेती बँकांची स्थापना केली. समान उद्दिष्ट्ये असणाऱ्या लोकांनी स्वतःच्या उन्नतीसाठी या पतपुरवठा संस्थेच्या स्थापनेत पुढाकार घेतला. अशा लोकांना त्यांच्या वैयक्तिक हमीवर कर्जपुरवठा केला जातो. सभासद व इतर व्यक्तींकडून ठेवी स्वीकारणे, बँकिंग सेवा उपलब्ध करून देणे, गुंतवणूकदारांना सवलती देणे इत्यादी कार्ये या संस्थांकडून केली जातात.

सन १९१४ ला पहिल्या महायुद्धास सुरुवात झाली. या कालखंडात मोठ्या प्रमाणात संयुक्त भांडवली बँका बुडाल्या परंतु नागरी बँका कमी प्रमाणात बुडाल्या. या पार्श्वभूमीवर १९१५ मध्ये नेमलेल्या मॅक्लॅगन समितीने अशी शिफारस केली की, " नागरी सहकारी बँकांचे उच्च व मध्यमवर्गीय लोकांच्यातील बँकिंगचे व्यवसायातील असणारे महत्त्व त्याची त्याची माहिती सर्व समाजाला करून दिली पाहिजे. त्याचपद्धतीने सहकारी चळवळीच्या विकासासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. नागरी बँकांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात योग्य व्यवस्थापन व कार्यक्षमतेची गरज आहे."

स्वातंत्र्यानंतर शहरी भागातील नागरी बँकांचे वाढत जाणारे महत्त्व लक्षात घेता नागरी बँकाच्या विकासासाठी रिझर्व्ह बँकेने अनेक समित्या नियुक्त करून त्यांनी केलेल्या शिफारशींची अमंलबजावणी केलेली आहे. रिझर्व्ह बँकेच्या योग्य धोरणामुळे नागरी सहकारी बँकेच्या विकास मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो.

## १.२ नागरी सहकारी बँकेच्या व्याख्या :-

### १.२.१ मेहता/भन्सली कमिटी - (१९३९)

"ज्या नागरी पतपुरवठा संस्थेचे भाग भांडवल रूपये २० हजार किंवा त्यापेक्षा जास्त आहे व जी पतपुरवठा संस्था चालू खात्यावर अशा ठेवी स्वीकारते की, ठेवी, चेक्स, ड्राफ्टसद्वारे परत करते ती नागरी पतपुरवठा

संस्था म्हणजे नागरी सहकारी बँक होय.''

### १.२.२ वर्दे समितीची व्याख्या :-

सन १९६३ मध्ये श्री. वामनराव वर्दे यांच्या अध्यक्षतेखाली ''स्टडी ग्रुप ऑन क्रेडिट को. ऑपरेटिव्हज इन दि नॉन ॲग्रिकल्चरल सेक्टर'' हे अभ्यास गट बिगरशेती पतपुरवठा संस्था, पगारदार नोकरांच्या पतपुरवठा संस्था आणि नागरी सहकारी बँका यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करण्यासाठी नियुक्त केली होती. या अभ्यास गटाने नागरी बँकेच्या व्याख्येसाठी काही निकष दिले आहेत. ते पुढीलप्रमाणे-

१. नागरी किंवा अर्धनागरी विभागात राज्य सहकारी कायद्यान्वये नोंदवलेली सहकारी पतपुरवठा संस्था

२. किमान भागभांडवल रूपये ५०,००० आणि

३. कर्जे देण्यासाठी किंवा गुंतवणुकीसाठी सभासद अगर बिगर सभासदांच्या ठेवी स्वीकारणे, ड्राफ्ट किंवा अन्य मार्गाने ठेवीदारास किंवा त्याच्या आदेशान्वये इतरास परत करणे, अशा प्रकारची बँकिग सेवा करणारी संस्था.

### १.२.३. बँक नियमन कायदा -(१९४९)

हा कायदा नागरी सहकारी बँकाना १९६६ पासून लागू करण्यात आला या कायद्यानुसार या बँकाना 'प्राथमिक सहकारी बँक' असे संबोधले जाते या कायद्यानुसार 'ज्या नागरी सहकारी बँकाचे भागभाडंवल एक लाख रूपयापेक्षा अधिक आहे. ज्या बँका सामान्य बँकिंग कार्ये करतात आणि ज्या इतर सहकारी संस्थाना सभासदत्व देत नाहीत अशा बँकांना 'प्राथमिक सहकारी बँक' असे म्हणतात.

### १.३ नागरी सहकारी बँकांची उद्दिष्टेः-

१. शहरी भागातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल आणि मध्यमर्गीय लोकांच्या वित्तीय गरजा भागविणे.

२. शहरी भागातील सावकरी, व्यापारी व नातेवाईक यांच्या कर्जाचे प्रमाण कमी करणे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

३. पगारदार लोकांना स्थावर मालमत्ता खरेदी करण्यासाठी मदत करणे.

४. शहरी भागातील कमी उत्पन्न गटातील लोकांना काटकसर व बचतीची सवय निर्माण करणे.

५. शहरी भागातील सुशिक्षित बेकारांना स्वयंरोजगारासाठी कर्जपुरवठा उपलब्ध करून देणे.

६. शहरी भागातील लघुउद्योगांना विशिष्ट अटीवर कर्जपुरवठा करण्यासाठी मोठ्या प्रमाणात मदत करणे.

७. शहरी भागातील कमी उत्पन्न गटातील लोकांच्या कर्जासाठी होणाऱ्या पिळवणुकीला आळा घालून त्यांना मुबलक स्वरुपात कर्जपुरवठा उपलब्ध करून देणे.

## १.४ नागरी बँकाचे कार्यक्षेत्र :-

नागरी बँकाचा विचार करत असताना त्याचे कार्यक्षेत्र महत्त्वाचे असलेले दिसून येते. परंतु नागरी बँकांच्या कार्यक्षेत्रबाबत सहकार तज्ञामध्येसुद्धा एकमत असल्याचे दिसून येत नाही. स्वातंत्र्यानंतर बरीच वर्ष नागरी बँकाचे कार्यक्षेत्र शहरापुरतेच मर्यादीत होते. अलीकडे रिझर्व्ह बँकाच्या सहमतीने नागरी बँका आपले कार्यक्षेत्र वाढवत आहेत. सध्या नागरी बँकाचे कार्यक्षेत्र तालुका जिल्हा किंवा राज्याबाहेर कोठेही आपली शाखा उघडू शकतात. म्हणजेच याचा अर्थ असा की, नागरी बँकचे शहरापूरते मर्यादीत क्षेत्राची मर्यादा ओलांडून बँकाचे कार्यक्षेत्र मोठ्या प्रमाणात विस्तारत असल्याचे दिसून येते.

## १.५ नागरी बँकांचे सभासदत्वः-

नागरी बँका आपल्या कार्यक्षेत्रातील नागरीकांना सभासदत्व काही अटीवर देत असते. छोटे व्यापारी, उद्योजक, व्यावसायिक यांना अग्रक्रमाने सभासदत्व दिले जाते. अलीकडे सहकार कायद्यातील बदलानुसार ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सभासदत्व दिले जाते.

## १.६ नागरी बँकाचे व्यवस्थापन :-

नागरी सहकारी बँकांचे व्यवस्थापन सभासदांनी निवडून दिलेल्या

संचालकांच्या हाती असते हे संचालक मंडळ बँकेच्या दैनंदिन कारभारावर नियंत्रण ठेवत असते. अलीकडे नागरी बँकाना व्यापारी बँकाबरोबर स्पर्धा करावी लागत आहे त्याचबरोबर रिझर्व्ह बँकेचे असणारे नियम मोठ्या प्रमाणात व्यापारी बँकाबरोबर नागरी बँकांनाही लागू केले जात आहेत. संचालक मंडळाची ध्येय धोरणे कर्मचाऱ्याचे कौशल्य इत्यादीवर बँकाचे यश अवलंबून असते.

## १.७ नागरी बँकांचे भागभांडवल :-

नागरी सहकारी बँका सभासदामध्ये भागाची विक्री करून भांडवल उभे करतात. पूर्वी भागभांडवलाची मर्यादा २०,००० रूपये होती. सन १९६६ पासून बँक नियमन कायद्यानुसार या बँकाचे भागभांडवल व राखीव निधी कमीतकमी एक लाख रूपयांइतके असले पाहिजे. सामान्यपणे एका भागाची किंमत २५ रूपये आकारली जाते. समाजातील सामान्य व्यक्तीलासुद्धा सभासद होता यावे या उद्देशाने भागाची किंमत कमी ठेवली जाते. सभासद जेव्हा कर्ज घेतात. तेव्हा कर्जाच्या विशिष्ट प्रमाणात भागांची खरेदी करण्याचे बंधन त्याच्यावर घातले जाते. यामुळे या बँकांना आपले भागभांडवल वाढविता येते शिवाय या बँका सभासद व बिगर सभासदांकडून ठेवी स्वीकारतात तसेच जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून कर्जे घेतात.

## १.८ अभ्यासाची उद्दिष्टये :-

१. 'दि विटा अर्बन को ऑप बँक लि. विटा' बँकेचे भांडवल रचना, ठेवींची गतिशीलता, कर्जव्यवहार नफा तोटा पत्रक यांचे मूल्यमापन करणे.

२.' दि विटा अर्बन को. ऑप बँक लि. विटा' बँकेचे कर्जव्यवहाराचे प्रमाण व अनिष्पादीत मालमत्तेचा दर पाहणे

३. बँकेच्या गुंतवणूक धोरणाचे विश्लेषण करणे व बँकेच्या गुंतवणूकीच्या विभागणीची माहिती घेणे

४. बँकेच्या आर्थिक कार्यक्षमतेसाठी बँकेला उपयुक्त व आवश्यक सुधारणा सुचवणे.

## १.९ अभ्यासाची परिकल्पना :-

दि विटा अर्बन को ऑप बँक लि. विटा. बँकेच्या कामकाजविषयी अभ्यास करत असताना सोईसाठी दहा वर्षाचा कालखंड घेतला आहे. त्याच्या आधारावर अध्ययनासाठी अधिष्ठान म्हणून पुढीलप्रमाणे परीकल्पना घेतली आहे.

**"सभासदांच्या आर्थिक विकासात विटा नागरी सह. बँकेची भूमिका"**

("Role of Vita Urban Co-Operative Bank in the Economics Development of Members")

## १.१० अभ्यास पद्धती :-

सहकारी चळवळीचा एक महत्त्वाचा घटक,म्हणून नागरी सहकारी बँकाकडे पाहिले जाते. समाजातील कमी उत्पन्न गटातील लोकांना तसेच दुर्बल घटकांना आर्थिक सहाय्य करण्याच्या हेतूने नागरी बँकाचा उदय झाला. या बँकांनी भारताच्या आर्थिक विकासात महत्त्वाचे स्थान पटकावले आहे. त्याच बरोबर सहकारी चळवळीत नागरी बँकानी महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. त्यामुळे नागरी बँकाची कार्यपद्धती पाहणे आवश्यक ठरते.

## १.११ कालखंड :-

दि विटा अर्बन को ऑप बँक लि. विटाच्या स्थापनेपासून अध्ययनासाठी बँकेच्या १९९५-२००५ चा वर्षापर्यंतची आकडेवारीचा वापर करून निष्कर्ष काढले आहेत. अभ्यासाचा कालावधी दहा वर्षाचा आहे. वेगवेगळ्या माहितीवरून व आकडेवारीवरून काढलेल्या निष्कर्षाच्या संदर्भात भविष्यात बँकेंची प्रवृत्ती कशी राहिल हे तपासून पाहणे शक्य होईल.

## १.१२ संशोधनाचे स्वरुप :-

दि विटा अर्बन को. ऑप बँक लि. विटा या नागरी सहकारी बँकेचा अभ्यास करत असताना आवश्यक असणारी सर्व माहिती बँकेच्या वार्षिक अहवालातून घेतली आहे. अधिकची माहिती बँकेच्या कार्यालयीन दफ्तरातून मिळवली आहे. गरजेनुसार बँकेच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून माहिती उपलब्ध करून घेतली. सहकारी चळवळीसंबधीची माहिती संदर्भ ग्रंथ व

सांगली जिल्ह्यांच्या उपनिबंधकांच्या कार्यालयातून आणि इतर कार्यालयातून माहिती संकलित केली म्हणून नागरी सहकारी बँकेचा अभ्यास करताना पूर्णपणे दुय्यम साधन सामग्रीचा वापर केला आहे.

एका नागरी बँकेच्या अभ्यासावरून काढलेले निष्कर्ष सर्वच सांगली जिल्ह्यातील बँकांना अगदी तंतोतंत लागू पडतील असे नाही. परंतु यावरून नागरी सहकारी बँकाच्या कार्यपद्धतीचा अंदाज मात्र निश्चित येईल. प्रस्तुत अभ्यासात एकाच बँकेचा अभ्यास असल्याने येणाऱ्या निष्कर्षाची व्याप्ती देखील मर्यादीतच राहणार आहे. नागरी सहकारी बँकेची कार्यपद्धती कशी असावी यावरून दि विटा अर्बन को-ऑप. बँक लि. विटा या बँकेची कार्यपद्धती कशी असेल याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## १.१३ माहितीचे संकलन :-

दि विटा अर्बन को. ऑप बँक लि. विटा बँकेचा अभ्यास करताना प्रामुख्याने आवश्यक असणारी सर्व माहिती बँकेच्या वार्षिक अहवालातून घेतली आहे. अधिकची माहिती मिळवण्यास संचालक मंडळ, बँकेतील अधिकारी यांच्याशी चर्चा करून मिळवली. तसेच इतर माहिती बँकिंग क्षेत्रातील अनुभवी व्यक्ती यांच्या भेटी घेऊन अभ्यासाचा हेतू स्पष्ट करून त्यांच्याशी चर्चा करून मिळवली.

या अभ्यासासाठी प्रामुख्याने दुय्यम साधनसामग्रीचा वापर केलेला आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी कालावधीची निवड करत असताना तो सन १९९५ ते २००५ हा दहा वर्षाचा निवडला आहे. प्रत्यक्षात तक्ता मांडणीच्या सोयीसाठी व निष्कर्षासाठी कमी कालावधीची निवड करण्यात आली आहे. आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी प्रामुख्याने वार्षिक सरासरी वाढ, प्रतीवर्षी झालेला बदल, वार्षिक आकड्याचे निर्देशांक, गुणोत्तर, टक्केवारी इत्यादीचा वापर केलेला आहे.

## १.१४ साहित्याचा आढावा :-

### १.१४.१ एम. फिल. प्रबंधाचा आढावा :-

१. "वारणा को. ऑप बँक अ केस स्टडी इन को. ऑप बँकिंग अॅण्ड

रुरल डेव्हलपमेंट'' या विषयावर श्री. पाटील एस. एस. यांनी डॉ. जे. एफ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नोव्हें. १९८५ मध्ये एम. फिल पदवीसाठी शिवाजी विद्यापीठास प्रबंध सादर केलला आहे. त्यांनी नागरी सहकारी बँकाचे उत्पन्न, खर्च, नफा इत्यादी विषयी अभ्यास केला.

२. 'अ स्टडी ऑफ लोन्स ॲण्ड ॲडव्हान्सेस ऑफ श्री भारत अर्बन को-ऑप. बँक लि., जयसिंगपूर जि. कोल्हापूर' या विषयावर श्री. दबडे एस. एस. यांनी शिवाजी विद्यापीठास १९८७ मध्ये एम. फिल पदवीसाठी प्रबंध सादर केला आहे. हा प्रबंध डॉ. शेट्टी सी. एस. यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आला असून संशोधकाने या बँकेच्या कर्जपुरवठ्याबाबत अभ्यास केला आहे.

३. श्री. मुंडेकर बी. आर यांनी डॉ. भानुशाली सु. गो. यांच्या मार्गदर्शनाखाली आक्टो. १९९० मध्ये 'नागरी सहकारी बँकाच्या अभ्यास विशेष संदर्भ श्री शाहू सहकारी बँक मर्यादित कोल्हापूर' या विषयावरील प्रबंध शिवाजी विद्यापीठास सादर केला आहे. त्यात त्यांनी कोल्हापूर' शहरातील नागरी बँकाचा प्रगतीचा आढावा घेतला आहे. तसेच नागरी बँकेच्या कर्ज व ठेवीबाबत अभ्यास केला आहे.

४. 'फिनान्सिअल ॲनालेसिस ऑफ दि प्रायमरी टिचर्स को-ऑप. बँक लि., सातारा' या विषयावर जून १९९६ मध्ये एम्. फिल. पदवीसाठी श्री. एच. ए. बिरमाने यांनी डॉ. चौधरी जे. एस. यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंध सादर केला आहे. तसेच बँकेची रोखता, लाभता व सुरक्षितता यांचा अभ्यास केला आहे.

५. 'कराड अर्बन को-ऑप. बँकेचे कामकाज' या विषयावर एप्रिल १९९५ मध्ये एम. फिल पदवीसाठी सौ. कांचन रामराव पाटील यांनी रवींद्र श. जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंध सादर केला आहे. त्यात त्यांनी अर्बन बँकेचे आर्थिक स्थैर्य याविषयी अभ्यास केला आहे.

### १.१४.२ पीएच. डी. प्रबंधाचा आढावा :-

१. सौ. कोळी पी. पी. यांनी १९९० मध्ये डॉ. नाईक टी. जी. यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी. पदवीसाठी शिवाजी विद्यापीठास प्रबंध सादर

केला आहे. 'अ क्रिटीकल अप्राईसल ऑफ वुमन्स अर्बन को-ऑप. बँक्स इन वेस्टर्न महाराष्ट्र' हा त्यांच्या संशोधनाचा विषय असून संशोधकांनी महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांच्या कामकाज पद्धतीचे टीकात्मक विवेचन केले आहे.

२. श्री. वाय. डी. पुजारी यांनी २००२ मध्ये डॉ. ए. एस्. महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच्. डी. पदवीसाठी शिवाजी विद्यापीठास प्रबंध सादर केला आहे. 'सोलापूर जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांचे वित्तीय विश्लेषण' हा त्यांच्या संशोधनाचाविषय होता. त्यात त्यांनी सोलापूर जिल्ह्यातील नागरी बँकांच्या दुय्यम तथ्यांचे विश्लेषण केलेले आहे.

३. श्री. शाळगावकर एस्. डी. यांनी डॉ. श्रेष्ठी सी. एस. यांच्या मार्गदर्शनाखाली मे १९९५ मध्ये 'वर्किंग ऑफ अर्बन को-ऑप. बँक इन सातारा डिस्ट्रिक्ट' या विषयावरील प्रबंध शिवाजी विद्यापीठास पीएच. डी. पदवीसाठी सादर केला आहे. सातारा जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांच्या ठेवी, पतविषयक धोरण, कर्जे व थकबाकी इत्यादी विविध घटकांचा सविस्तर अभ्यास यात केला आहे.

४. श्री. जाधव एन. एल. यांनी 'अ स्टडी ऑफ सिलेक्टेड अर्बन को-ऑप. बँकस् इन सांगली' या विषयावर जून १९९४ मध्ये डॉ. श्रेष्ठी सी. एस. यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठास पीएच. डी. पदवीसाठी प्रबंध सादर केला आहे. संशोधकाने नागरी सहकारी बँकांचा ग्राहक सेवेच्या बाबतीत विशेष अभ्यास केला आहे. सांगली जिल्ह्यातील नागरी सहकारी चळवळीचा विकास आणि ग्राहक सेवा यांच्यातील परस्पर संबंध स्पष्ट केला आहे. सांगली जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची रचना आणि संघटन पद्धतीचा अभ्यास केला आहे.

५. श्री. गायकवाड वाय. एस. यांनी 'शिरोळ आणि हातकणंगले तालुक्यातील नेतृत्वाचे सहकारी चळवळीच्या विकासातील योगदान' या



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

विषयावर एप्रिल २००७ मध्ये डॉ. पी. बी. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठास पीएच. डी. पदवीसाठी प्रबंध सादर केला आहे. संशोधकाने दोन तालुक्यामधील सहकारी चळवळीचा विकासातील वाटा, सहकारी नेतृत्व, चळवळीची प्रगती व सहकारामुळे झालेला सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक विकास यासंदर्भात अभ्यास केला आहे.

## १.१५ अभ्यासाचा आराखडा :-

प्रकरण पहिले

### प्रास्ताविक व अभ्यासाची रुपरेषा

या प्रकरणात नागरी बँकांचा पूर्वेतिहास, नागरी बँकांची व्याख्या, नागरी बँकांची उद्दिष्ट्ये, नागरी बँकांचे कार्यक्षेत्र, सभासदत्व, व्यवस्थापन, अभ्यासपद्धती, संशोधनाचे स्वरुप, अभ्यासाची उद्दिष्ट्ये घटकांची माहिती घेण्यात आली आहे.

प्रकरण दुसरे

### सहकारी बँकाचा उदय व विकास

या प्रकरणात सहकारी चळवळीचा विकास, सहकाराची व्याख्या, सहकाराची लक्षणे, सहकाराची रचना, भारतातील सहकारी चळवळ, महाराष्ट्रातील सहकारी चळवळ, सहकारी चळवळीचा विभागीय असमतोल यांचा अभ्यास केला आहे.

प्रकरण तिसरे

### 'दि विटा अर्बन को-ऑप. बँक लि., विटा' ची ऐतिहासिक पार्श्वभूमी

या प्रकरणात विटा अर्बन बँकेची ऐतिहासिक पार्श्वभूमी घेण्यात आली आहे. तिची स्थापना, स्थापनेची उद्दिष्ट्ये याबरोबर भारतातील नागरी बँकांची सद्यःपरिस्थिती व महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांची वाटचाल यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

प्रकरण चौथे

## 'सभासदांच्या विकासात विटा नागरी सह. बँकेची भूमिका'

या प्रकरणात बँकेचे कामकाज व सभासदाच्या विकासात विटा अर्बन को-ऑप. बँक लि., विटा' ने पार पाडलेली भूमिका, ठेवी, सभासद, कर्ज, उत्पन्न, खर्च, थकबाकी, नफा तोटा, लाभांश, अनिष्पादित मालमत्ता इत्यादींचा अभ्यास करण्यात आला आहे.

प्रकरण पाचवे

## गोषवारा आणि उपसंहार

शेवटच्या प्रकरणात अभ्यासाचा आधारे काढलेले निष्कर्ष व बँकेची उपयुक्तता आणि कार्यक्षमता सुधारण्यासाठी केलेल्या उपयोजना सुचवण्यात आलेल्या आहेत.

### १.१६ अभ्यासाचा मर्यादा :-

सदर बँकेचा अभ्यास करत असताना तो ठराविक कालावधीत पूर्ण करणे आवश्यक असल्याने त्याचबरोबर दि. विटा अर्बन को. ऑप. बँक लि. विटा या एकाच बँकेचा अभ्यास केला असल्याने काढलेले निष्कर्ष सर्वच नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राला लागू पडतील असे नाही त्याचबरोबर बँकेच्या ठेवी, कर्ज, भागभांडवल, सभासद, एन.पी.ए. इ. घटकांचे विवेचन १९९५ ते २००५ या मर्यादित कालावधीतच केले आहे.

### १.१७ सारांश :-

नागरी भागाततील अल्प उत्पन्न गटातील लोकांनी सहकारी पद्धतीने बँक स्थापन करून विकसित केल्यामुळे बँकिंग क्षेत्राचा विकास झाला. नागरी बँकामुळे मोठ्या प्रमाणात लोकांना बचतीची सवय लागते. त्यामुळे उत्पन्न वाढण्यास मोठ्या प्रमाणात मदत झाली आहे. १८८९ मध्ये भारतात पहिली नागरी सहकारी बँक स्थापन झाली १९११ च्या सहकार कायद्याने त्यांच्या विकासाला चालना मिळाली परंतु प्रादेशिक विकास असमान झाला.

या बँकांनी महत्त्वाची भूमिका बजावल्याने त्याचा अभ्यास करणे जरूरीचे आहे. सर्वच नागरी बँकांचा अभ्यास करणे शक्य नसल्याने दि. विटा अर्बन को. ऑप. बँक लि. विटा. या एकाच बँकेचा सविस्तर अभ्यास केला आहे. १९९५ ते २००५ या कालावधीतील ठेवी, कर्ज N.P.A. इ. या अभ्यास केला आहे. बँकेचे संचालक, व्यवस्थापक, अधिकारी यांच्याबरोबर चर्चा करून तसेच निरनिराळे अहवाल पुस्तके, अधिकारी यांच्याबरोबर चर्चा करून तसेच जिल्हा उपनिबंधकाकडील कागदपत्रे अभ्यासून तथ्य संकलन केले आहे.